सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र. : २७७/२०२४

**विषय : महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांची बँक खातेविषयक अद्ययावत माहिती महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये भरणेबाबत...**

आपणास विदित आहेच की, भारत सरकारने वित्तिय क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात अनेक पावले उचलली आहेत. याअनुषंगाने रोख विरहीत अर्थव्यवहार करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच "Direct Benefit Transfer (DBT)" (थेट लाभ हस्तांतरण) अवलंब करण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी सेवकांना देय असणा-या परीक्षेसंबंधी किंवा इतर कोणत्याही रकमा भविष्यात संबंधित कर्मचाऱ्याच्या बँक खात्यावर वर्ग करण्याचे नियोजित केले असून, त्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, सर्व संलग्न महाविद्यालयांनी त्यांच्याकडील परीक्षा आयोजन कामातील सर्व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांची बँक खात्याची सविस्तर माहिती संबंधित महाविद्यालयाच्या BOD Login मध्ये खाली दिलेल्या link च्या प्रमाणे भरण्यात यावी.

BOD Online → Login → Enter College Credential → College Profile → Staff Details→Non-Teaching Information

विद्यापीठाकडून परीक्षा आयोजन विषयक कामाचे मानधन देय असणा-या विविध रकमांसाठी शिक्षकांचे प्रोफाईल आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांचे बँक खात्यांची माहिती योग्य ती दक्षता घेऊन (अद्ययावत बँक खाते, IFSC कोड, K.Y.C पूर्णत्व) भरावी व विद्यापीठास सहकार्य करावे. संगणक प्रणालीद्वारे या माहितीचा वापर करुन शिक्षक-शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांच्या बँक खात्यामध्ये संबंधित परीक्षा कामाचे मानधन भविष्यात वर्ग करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
**जा.क्र.:** वित्त/२०२४-२५/५८०
**दिनांक :** १२/११/२०२४

**सीएमए (डॉ.) चारुशीला गायके**
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
२. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
३. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
४. उपकुलसचिव, संलग्नता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.